**प्रेसनोट** दि. 08/05/2026

**अ‍ॅन्टी करप्शनच्या पुणे घटकाकडून सजा निमगाव खंडोबा,ता – खेड, जि. पुणे येथे वारसनोंद करण्याकरीता संबंधीत तलाठी व कोतवाल यांचेविरोधात लाचमागणी व स्विकारलेप्रकरणी कारवाई केलेबाबत.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | **पुणे घटक** |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | खेड राजगुरुनगर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7 अन्वये |
| तक्रारदार | पुरुष वय 34 वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | 1) श्रीमती मनीषा साहेबराव माने वय 45 वर्ष, ग्राम महसूल अधिकारी/ तलाठी, निमगाव खंडोबा, तालुका खेड राजगुरुनगर, जिल्हा पुणे राठी . ए 107, उमादर्शन सोसाइटी, वाढ रोड, राजगुरुनगर खेड, तालुका खेड, जिल्हा पुणे **(वर्ग 3)**<br>2) श्री दत्तात्रय छबू चव्हाण, वय - 58 वर्षे, पद कोतवाल निमगाव खंडोबा, तालुका खेड राजगुरुनगर, जिल्हा पुणे, रा ठि- खरपुडी बुद्रुक, तालुका खेड, जिल्हा पुणे |
| सुरवातीची लाच मागणी | रू. 6,000/- ( सहा हजार रुपये) |
| पडताळणी दरम्यान लाच मागणी | तडजोडीअंती 5500/- ( पाच हजार पाचशे रुपये) |
| पडताळणी दिनांक | दि. 08/05/2026 रोजी |
| स्वीकारलेली लाच रक्कम | 5500/- ( पाच हजार पाचशे रुपये) |
| सापळा दिनांक | दि. 07/05/2026 रोजी 15.40 वाजता |
| ठिकाण | निमगाव खंडोबा ग्राम महसुल कार्यालय, तालुका खेड - राजगुरुनगर, जि. पुणे |
| सापळा अधिकारी यांचे नाव व पद | श्रीमती शैलजा शिंदे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. पुणे (मो.क्र. 7722011255) |
| तपास अधिकारी यांचे नाव व पद | श्री अविनाश घरबुडे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. पुणे (मो.क्र. 9860667770) |

**थोडक्यात माहिती :-** यातील तक्रारदार यांचे वडील व इतर नातेवाईक यांचे नावे खरपुडी बुद्रक गट क्रमांक व उपविभाग 792 भोगवाट वर्ग 1 क्षेत्र 0.38.00 अशी वडिलोपार्जित जिरायत जमीन आहे. तक्रारदार यांच्या वडिलाचें 2024 मध्ये निधन झाले आहे. त्यामुळे सदर जमिनीवर वारसनोंद घेण्याकरीता तक्रारदार यांनी दिनांक 06/03/2026 रोजी निमगाव खंडोबा ग्राम महसूल कार्यालय येथील अधिकारी आलोसे क 1 मनीषा पाटील यांना अर्ज दिला, वारंवार चौकशी करून देखील तक्रारदार व त्यांचे भाऊ आणि बहिणीची जमिनीला वारसा नोंद केली नाही. दिनांक 30/03/2026 रोजी तक्रारदार हे वारसा नोंदणी बाबत चौकशी करण्याकरिता निमगाव खंडोबा ग्राम महसूल कार्यालय येथे गेले असता आलोसे क्रमांक 1 श्रीमती माने यांनी आलोसे क्रमांक 2 चव्हाण यांना तक्रारदार यांचेकडून वारसा नोंद करण्यासाठी पैसे घेण्यास सांगितले.

दिनांक 07/05/2026 रोजी तक्रारदार हे आलोसे क्रमांक 2 यांना भेटले असता त्यांनी तक्रारदार यांचेकडे आलोसे क्रमांक 1 व स्वतः साठी 6000/ रुपयांची लाच मागणी केली. याबाबत दिनांक 07/05/2026 रोजी तक्रारदार यांनी तक्रार दिली होती.

प्रस्तुत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक 08/05/2026 रोजी केलेल्या लाच मागणी पडताळणी कारवाईदरम्यान आलोसे श्रीमती मनीषा पाटील व आलोसे श्री चव्हाण यांनी तक्रारदाराच्या वरील कामासाठी तक्रारदाराकडे तडजोडी अंती 500 रुपये stamp चे व वारसा नोंद करण्याकरिता 5000/- रुपये अशी एकूण 5500/ रुपयांची मागणी केली.

वर, नमूद प्रमाणे लाच मागणी झाल्यानंतर दिनांक 07/05/2026 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पुणे पथकाने सापळा कारवाई केली असता आरोपी लोकसेवक क्रमांक 1 श्रीमती मनीषा साहेबराव माने यांनी तक्रारदाराकडून 5500/- रुपये लाच स्वीकारली असता 15:40 वा. आलोसे क्रमांक 1 श्रीमती मनीषा माने व आलोसे क्रमांक 2 श्री दत्तात्रय चव्हाण यांना निमगाव खंडोबा ग्राम महसूल कार्यालय तालुका खेड राजगुरूनगर, जिल्हा पुणे येथे दोघांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

वर नमुद आरोपी लोकसेवक यांना ताब्यात घेऊन त्यांच्याविरूद्ध खेड - राजगुरुनगर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा 1988 कलम 7 प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

Scanned with CamScanner

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री.शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि. पुणे, अपर पोलीस अधीक्षक श्री. अर्जुन भोसले, ला.प्र.वि. पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली. लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे (मो.क्र. 9823167154) तसेच अपर पोलीस अधीक्षक-1 श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि.,पुणे (मो.क्र. 9029030530) यांनी केले आहे.

1) अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे- दुरध्वनी क्रमांक -020-26122134, 26132802, 26050423, **9403781064**
2) व्हॉट्स-अ‍ॅप क्रमांक - 9403781064 (पुणे), 9930997700 (मुंबई)
3) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
4) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
5) ऑनलाईन अ‍ॅप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

सहायक पो आयुक्त/पोलीस उप-अधिक्षक * अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो * सत्यमेव जयते

08/05/2026
(सतिश संभाजी वाळके)
सहा.पोलीस आयुक्त/पो.उप.अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पुणे

Scanned with CamScanner